3 0 AUG 2026

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# उच्च शिक्षणातील सर्वेक्षणात विद्यापीठाची आघाडी

## २८२ पैकी २८० महाविद्यालयांची नोंदणी पूर्ण; शैक्षणिक निर्देशांक निश्चित होणार

■ संतोष मिठारी : सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. २९ : अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षणांतर्गत (एआयएसएचई) वेबपोर्टलवर नोंदणी करण्यात शिवाजी विद्यापीठाने आघाडी घेतली आहे. विद्यापीठाशी संबंधित एकूण २८२ संस्थांपैकी २८० संस्थांनी या पोर्टलवर नोंदणी करून माहिती सादर केली आहे. विद्यापीठाच्या नोंदणीचे प्रमाण ९९.३ टक्के झाले आहे.**

केंद्र सरकारच्या शिक्षण मंत्रालयातर्फे उच्च शिक्षण क्षेत्रातील संस्थांची माहिती संकलित करण्यासाठी एआयएसएचई सर्वेक्षण राबविले जाते. देशातील उच्च शिक्षण संस्थांची संख्या, विद्यार्थी प्रवेश, शिक्षक संख्या, अभ्यासक्रम, पायाभूत सुविधा यांसह विविध शैक्षणिक बाबींची माहिती या सर्वेक्षणातून संकलित केली जाते. उच्च शिक्षण क्षेत्राचे धोरणात्मक नियोजन आणि विविध शैक्षणिक निर्देशांक निश्चित करण्यासाठी या माहितीला महत्त्व आहे. शिवाजी विद्यापीठाच्या २८२ संस्थांपैकी २८० संस्थांनी नोंदणी पूर्ण केली आहे. अवघ्या दोन संस्थांची माहिती प्रलंबित आहे. एकूण पाहता या कामगिरीमुळे विद्यापीठाचा एआयएसएचई नोंदणीचा टक्का राज्यातील अन्य विद्यापीठांच्या तुलनेत लक्षणीय आहे.

### दिरंगाई केल्यास कारवाई

■ राज्यातील सर्व विद्यापीठे तसेच त्यांच्या अंतर्गत येणाऱ्या सर्व संलग्नित व स्वायत्त महाविद्यालयांना एआयएसएचई कोड आणि प्रमाणपत्र प्राप्त करणे उच्च शिक्षण संचालनालयाने सक्तीचे केले आहे. याबाबत दिरंगाई करणाऱ्यावर कारवाई करावी, असे आदेश उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी सर्व विद्यापीठे, विभागीय सहसंचालकांना गेल्या महिन्यात दिले आहे.



एआयएसएचई पोर्टलवरील अचूक आणि वेळेत सादर केलेली माहिती उच्च शिक्षण संस्थांच्या एकूण शैक्षणिक स्थितीचे मूल्यांकन करण्यासाठी महत्त्वाची ठरते. त्यामुळे शिवाजी विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांनी नोंदणी प्रक्रियेला दिलेले प्राधान्य विद्यापीठाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे.
**- डॉ. प्रकाश बच्छाव**, सहसंचालक, उच्च शिक्षण कोल्हापूर विभाग

विद्यापीठाने तेरा वर्षांपासून एआयएसएचईबाबतचे कामकाज गांभीर्याने व सातत्याने पूर्ण केले आहे. सर्व नोडल अधिकारी, प्राचार्य यांच्या सक्रिय सहभागामुळे माहिती संकलन, सादरीकरणाचे काम वेळेत पूर्ण करणे शक्य झाले.
**-अभिजित रेडेकर**, सांख्यिकी अधिकारी, शिवाजी विद्यापीठ

### राज्यातील इतर विद्यापीठांची स्थिती

आकडेवारीत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ८६२ पैकी ८५९, मुंबई विद्यापीठाच्या ८८४ पैकी ८७२, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या ४८५ पैकी ४८४, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या ४७७ पैकी ४४४ संस्थांनी नोंदणी केली आहे. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या २९४ पैकी २६९, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या २२६ पैकी ११९ आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या १०३ पैकी ८२ महाविद्यालय-शैक्षणिक संस्थांनी नोंदणी केली आहे.

दरम्यान, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव आणि कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ रामटेक यांच्या उपलब्ध आकडेवारीनुसार अनुक्रमे १७८ पैकी १७८ आणि ३४० पैकी ३४० संस्थांनी नोंदणी पूर्ण केली आहे.

30 AUG 2026
सकाळ

**वॉक फॉर हेल्थ, वॉक फॉर युनिटी**

कोल्हापूर : मेजर ध्यानचंद यांची जयंती, राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठाचा क्रीडा अधिविभाग आणि स्पोर्टस् क्लबतर्फे वॉकेथॉन स्पर्धा झाली. कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांच्या हस्ते फ्लॅग ऑफ करून वॉकेथॉनला प्रारंभ झाला. 'फिट इंडिया, ॲक्टिव्ह इंडिया, हेल्दी इंडिया'चा संदेश देणाऱ्या उपक्रमात विविध वयोगटांतील विद्यार्थी, शिक्षक, अधिकारी, कर्मचाऱ्यांसह दोनशेहून अधिक नागरिक सहभागी झाले.

पान ४

# वॉक फॉर हेल्थ, वॉक फॉर युनिटी

## शिवाजी विद्यापीठात क्रीडा दिनानिमित्त वॉकेथॉन; दोनशेहून अधिक जण सहभागी

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २९ : मेजर ध्यानचंद यांची जयंती, तसेच राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभाग आणि स्पोर्टस् क्लबतर्फे वॉकेथॉन स्पर्धा झाली. कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांच्या हस्ते फ्लॅग ऑफ करून वॉकेथॉनला प्रारंभ झाला. 'फिट इंडिया, ॲक्टिव्ह इंडिया, हेल्दी इंडिया'चा संदेश देणाऱ्या उपक्रमात विविध वयोगटांतील विद्यार्थी, शिक्षक, अधिकारी, कर्मचाऱ्यांसह दोनशेहून अधिक नागरिक सहभागी झाले.

### निकाल अनुक्रमे असा

■ लहान गट (मुले): भावेश सिंह, राजवीर चौगुले, सर्वेश खोत. लहान गट (मुली): वेदू पाटील, पूर्वा गुरव, संस्कृती खंडागळे. मोठा गट (मुले): विक्रम भोसले, जोतिबा पाटील, श्रीधर खोत. मोठा गट (मुली): अवंती अवधूत सूर्यवंशी, प्रज्ञा प्रशांत जाधव, स्वरा शैलेश कुलकर्णी. शिक्षकेतर कर्मचारी (४० वर्षांखालील): रोहन पाटील, अभिजित जाधव, अभिजित कोठावळे. शिक्षकेतर कर्मचारी (४१ ते ५० वर्षे) : प्रशांत जाधव, सतीश हुक्केरी. शिक्षक गट : डॉ. नवनाथ वळेकर, जयप्रकाश पाटील, रवींद्र खी. महिला शिक्षक : प्रा. आसावरी कागवाडे, प्रा. दीपाली गवस. शिक्षकेतर कर्मचारी (महिला) : सुरेखा अडके. प्रशासकीय अधिकारी : अजित इंगळे.

डॉ. कामत यांच्या हस्ते मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन केले. स्वतः कुलगुरू वॉकेथॉनमध्ये सहभागी झाले. 'वॉक फॉर फिटनेस, वॉक फॉर हेल्थ, वॉक फॉर युनिटी' संदेशातून आरोग्य, एकता आणि क्रीडाभावनेचा जागर केला. 'एकत्र चालूया, निरोगी राहूया, फिट भारत घडवूया' हा संदेशही दिला. वॉकेथॉनमध्ये प्रशासकीय अधिकारी, शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी अशा विविध गटांसाठी स्वतंत्र स्पर्धा घेतली. महिला, पुरुषांसाठी स्वतंत्र गट ठेवले. ४० वर्षांपर्यंत, ४० ते ५० वर्षे आणि ५० ते ६० वर्षे अशी स्पर्धा झाली. विजेत्यांना डॉ. कामत, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते पदके प्रदान करून गौरविले.

प्रभारी क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी स्वागत केले. डॉ. अतुल टोणे, डॉ. सविता भोसले, सुनिता नाईक, अजय मडके, कृष्णात पाटील, संग्रामसिंह मोरे, प्रसाद देसाई, सुशील शिंदे, आकाश पाटील, तौहीद मुल्ला, नरेश यांनी नियोजन केले. राष्ट्रीय खेळाडू प्रतीक पाटील, प्रणव पाटील आदी उपस्थित होते. वॉकेथॉनमध्ये प्रेरणादायी सहभाग नोंदविल्याबद्दल माजी सैनिक प्रकाश गुरव, श्रीमती असमा नदेखान यांचा विशेष गौरव केला.

अजय पराडे यांनी सूत्रसंचालन केले. किरण पाटील यांनी आभार मानले.



कोल्हापूर : राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त वॉकेथॉनमधील विजेत्यांसमवेत कुलगुरू डॉ. आर. के. कामत आणि अधिकारी, कर्मचारी.

30 AUG 2026

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# क्रीडा दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात वॉकेथॉन

कोल्हापूर : प्रतिनिधी

हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधून शिवाजी विद्यापीठाचा क्रीडा अधिविभाग आणि स्पोर्टस् क्लबतर्फे वॉकेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांच्या हस्ते फ्लॅग ऑफ करून वॉकेथॉनला प्रारंभ झाला.

'वॉक फॉर फिटनेस, वॉक फॉर हेल्थ, वॉक फॉर युनिटी' या संदेशातून आरोग्य, एकता आणि क्रीडा भावनेचा जागर करण्यात आला. 'एकत्र चालूया, निरोगी राहूया, फिट भारत घडवूया' हा संदेशही देण्यात आला. प्रास्ताविक क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे, सूत्रसंचालन अजय मराठे यांनी केले. किरण पाटील यांनी आभार मानले. वॉकेथॉनमध्ये डॉ. राजाराम गुरव, डॉ. सागर डेळेकर, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. कबीर खराडे, डॉ. अभिजित रेडेकर, डॉ. सुभाष कोंबडे, आनंद खामकर, डॉ. राजेंद्र रायकर, राष्ट्रीय खेळाडू प्रतीक पाटील, प्रणव पाटील आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन डॉ. अतुल टोणे, डॉ. सविता भोसले, सुजित नाईक, अजय मराठे, कृष्णात पाटील, संग्रामसिंग मोरे, प्रसाद देसाई, सुनील शिंदे, आकाश पाटील, तौहीद मुल्ला आणि नंदेश यांनी केले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त आयोजित वॉकेथॉनमधील विजेत्यांसमवेत कुलगुरू डॉ. राजनीश कामत आणि अधिकारी, कर्मचारी.

वॉकेथॉन स्पर्धेचा गटनिहाय निकाल अनुक्रमे असा - लहान गट (मुले) : भावेश बिष्ट, राजवीर चौगुले, सर्वज्ञ खोत. लहान गट (मुली): वेसू पाटील, पूर्वा गुरव, संस्कृती खंडागळे. मोठा गट (मुले) : विक्रम भोसले, ज्योतिबा पाटील, श्रीधर खोत. मोठा गट (मुली): अवंती अवधूत सूर्यवंशी, प्रज्ञा प्रशांत जाधव, स्वरा शैलेश कुलकर्णी. शिक्षकेतर कर्मचारी (४० वर्षांखालील): रोशन पाटील, अभिजित जाधव, अभिजित कोठावळे. शिक्षकेतर कर्मचारी (४१ ते ५० वर्षे) : प्रशांत जाधव, सतीश हुक्केरी. शिक्षक गट : डॉ. नवनाथ वळेकर, जयप्रकाश पाटील, रवींद्र खैरे. महिला शिक्षक : प्रा. आसावरी कागवाडे, प्रा. दीपाली गवस. शिक्षकेतर कर्मचारी (महिला) : सुरेखा अडके. प्रशासकीय अधिकारी : अजित इंगळे. यावेळी वॉकेथॉनमध्ये प्रेरणादायी सहभाग नोंदवल्याबद्दल माजी सैनिक प्रकाश गुरव, आसमा बडेखान यांचा विशेष गौरव करण्यात आला.

30 AUG 2026

जनप्रवास

जनसपक कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वॉक फॉर हेल्थ, वॉक फॉर युनिटी

## राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात वॉकेथॉन



शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त आयोजित वॉकेथॉनला फ्लॅग ऑफने प्रारंभ करताना कुलगुरू डॉ. राजनीश कामत.

जनप्रवास : कोल्हापूर

हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त साजऱ्या करण्यात येणाऱ्या राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधून शिवाजी विद्यापीठाचा क्रीडा अधिविभाग आणि स्पोर्ट्स क्लबतर्फे शनिवारी सकाळी वॉकेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांच्या हस्ते फ्लॅग ऑफ करून वॉकेथॉनला प्रारंभ करण्यात आला. 'फिट इंडिया, ॲक्टिव्ह इंडिया, हेल्दी इंडिया'चा संदेश देणाऱ्या या उपक्रमात विविध वयोगटातील विद्यार्थी, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी यांच्यासह दोनशेहून अधिक नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

कुलगुरू डॉ. राजनीश कामत म्हणाले, मेजर ध्यानचंद जिथे शिकले, ते एल्फिन्स्टन महाविद्यालय समाविष्ट असलेल्या डॉ. होमी भाभा समूह विद्यापीठाचा कुलगुरू होण्याची संधी मला लाभली, याचा विशेष आनंद आणि अभिमान वाटतो. मेजर ध्यानचंद यांच्या क्रीडाक्षेत्रातील योगदानाचे स्मरण करत त्यांनी निरोगी जीवनशैली, नियमित व्यायाम आणि क्रीडाभावना अंगिकारण्याचे आवाहन त्यांनी केले. स्वतः कुलगुरूंनी वॉकेथॉनमध्ये सहभागी होत उपस्थितांना प्रोत्साहन दिले. विद्यापीठातील वरिष्ठ अधिकारी व कर्मचारीही मोठ्या संख्येने वॉकेथॉनमध्ये सहभागी झाले. 'वॉक फॉर फिटनेस, वॉक फॉर हेल्थ, वॉक फॉर युनिटी' या संदेशातून आरोग्य, एकता आणि क्रीडाभावनेचा जागर करण्यात आला. 'एकत्र चालूया, निरोगी राहूया, फिट भारत घडवूया' हा संदेशही देण्यात आला.

वॉकेथॉनमध्ये प्रशासकीय अधिकारी, शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनी अशा विविध गटांसाठी स्वतंत्र स्पर्धा घेण्यात आली. महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र गट ठेवण्यात आले. ४० वर्षांपर्यंत, ४० ते ५० वर्षे आणि ५० ते ६० वर्षे अशा वयोगटांमध्ये स्पर्धा झाली. विविध गट व वयोगटातील विजेत्यांना कुलगुरू डॉ. कामत, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते पदके प्रदान करून गौरविण्यात आले. क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. अजय मराठे यांनी सूत्रसंचालन केले. किरण पाटील यांनी आभार मानले. यावेळी डॉ. राजाराम गुरव, डॉ. सागर डेळेकर, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. कबीर खराडे, डॉ. अभिजीत रेडेकर, डॉ. सुभाष कोंबडे, कास्ट्राईबचे आनंद खामकर, डॉ. राजेंद्र रायकर, राष्ट्रीय खेळाडू प्रतीक पाटील, प्रणव पाटील आदी उपस्थित होते.

### वॉकेथॉन स्पर्धेचा निकाल

लहान गट (मुले) : भावेश बिष्ट, राजवीर चौगुले, सर्वज्ञ खोत. लहान गट (मुली) : येसू पाटील, पूर्वा गुरव, संस्कृती खंडागळे. मोठा गट (मुले) : विक्रम भोसले, ज्योतिबा पाटील, श्रीधर खोत. मोठा गट (मुली) : अवंती अवधूत सूर्यवंशी, प्रज्ञा प्रशांत जाधव, स्वरा शैलेश कुलकर्णी. शिक्षकेतर कर्मचारी (४० वर्षांखालील) : रोशन पाटील, अभिजीत जाधव, अभिजीत कोठावळे. शिक्षकेतर कर्मचारी (४१ ते ५० वर्षे) : प्रशांत जाधव, सतीश हुक्केरी. शिक्षक गट : डॉ. नवनाथ वळेकर, जयप्रकाश पाटील, रवींद्र खैरे. महिला शिक्षक : प्रा. आसावरी कागवाडे, प्रा. दिपाली गवस. शिक्षकेतर कर्मचारी (महिला) : सुरेखा अडके. प्रशासकीय अधिकारी : अजित इंगळे. यावेळी वॉकेथॉनमध्ये सहभाग नोंदविल्याबद्दल माजी सैनिक प्रकाश गुरव आणि आसमा बडेखान यांचा विशेष गौरव करण्यात आला.

30 AUG 2026

सिंधुदुर्ग समाचार

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात वॉकेथॉन



**कोल्हापूर/प्रतिनिधी :** हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त साजरा करण्यात येणाऱ्या राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधून शिवाजी विद्यापीठाचा क्रीडा अधिविभाग आणि स्पोर्ट्स क्लबतर्फे आज सकाळी वॉकेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांच्या हस्ते फ्लॅग ऑफ करून वॉकेथॉनला प्रारंभ करण्यात आला. 'फिट इंडिया, ॲक्टिव्ह इंडिया, हेल्दी इंडिया'चा संदेश देणाऱ्या या उपक्रमात विविध वयोगटांतील विद्यार्थी, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी यांच्यासह दोनशेहून अधिक नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

यावेळी कुलगुरू डॉ. राजनीश कामत म्हणाले, मेजर ध्यानचंद जिथे शिकले, ते एल्फिन्स्टन महाविद्यालय समाविष्ट असलेल्या डॉ. होमी भाभा समूह विद्यापीठाचा कुलगुरू होण्याची संधी मला लाभली, याचा विशेष आनंद आणि अभिमान वाटतो. मेजर ध्यानचंद यांच्या क्रीडाक्षेत्रातील योगदानाचे स्मरण करत त्यांनी निरोगी जीवनशैली, नियमित व्यायाम आणि क्रीडाभावना अंगिकारण्याचे आवाहन त्यांनी केले. स्वतः कुलगुरूंनी वॉकेथॉनमध्ये सहभागी होत उपस्थितांना प्रोत्साहन दिले. विद्यापीठातील वरिष्ठ अधिकारी व कर्मचारीही मोठ्या संख्येने वॉकेथॉनमध्ये सहभागी झाले. 'वॉक फॉर फिटनेस, वॉक फॉर हेल्थ, वॉक फॉर युनिटी' या संदेशातून आरोग्य, एकता आणि क्रीडाभावनेचा जागर करण्यात आला. 'एकत्र चालूया, निरोगी राहूया, फिट भारत घडवूया' हा संदेशही देण्यात आला.

वॉकेथॉनमध्ये प्रशासकीय अधिकारी, शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनी अशा विविध गटांसाठी स्वतंत्र स्पर्धा घेण्यात आली. महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र गट ठेवण्यात आले. ४० वर्षांपर्यंत, ४० ते ५० वर्षे आणि ५० ते ६० वर्षे अशा वयोगटांमध्ये स्पर्धा झाली. विविध गट व वयोगटांतील विजेत्यांना कुलगुरू डॉ. कामत, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते पदके प्रदान करून गौरविण्यात आले.

सुरवातीला कुलगुरू डॉ. कामत यांच्या हस्ते मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. अजय मराठे यांनी सूत्रसंचालन केले, तर किरण पाटील यांनी आभार मानले. वॉकेथॉनमध्ये विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. राजाराम गुरव, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक डॉ. सागर डेळेकर, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. कबीर खराडे, संगणक केंद्र संचालक डॉ. अभिजीत रेडेकर, डॉ. सुभाष कोंबडे, कास्ट्राईबचे आनंद खामकर, डॉ. राजेंद्र रायकर, राष्ट्रीय खेळाडू प्रतीक पाटील, प्रणव पाटील आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन डॉ. अतुल टोणे, डॉ. सविता भोसले, सुजित नाईक, अजय मराठे, कृष्णात पाटील, संग्रामसिंग मोरे, प्रसाद देसाई, सुनील शिंदे, आकाश पाटील, तौहीद मुल्ला आणि नंदेश यांनी केले.

वॉकेथॉन स्पर्धेचा सविस्तर निकाल अनुक्रमे असा- लहान गट (मुले): भावेश बिष्ट, राजवीर चौगुले, सर्वज्ञ खोत. लहान गट (मुली): येसू पाटील, पूर्वा गुरव, संस्कृती खंडागळे. मोठा गट (मुले): विक्रम भोसले, ज्योतिबा पाटील, श्रीधर खोत. मोठा गट (मुली): अवंती अवधूत सूर्यवंशी, प्रज्ञा प्रशांत जाधव, स्वरा शैलेश कुलकर्णी. शिक्षकेतर कर्मचारी (४० वर्षांखालील): रोशन पाटील, अभिजीत जाधव, अभिजीत कोठावळे. शिक्षकेतर कर्मचारी (४१ ते ५० वर्षे): प्रशांत जाधव, सतीश हुक्केरी. शिक्षक गटः डॉ. नवनाथ वळेकर, जयप्रकाश पाटील, रवींद्र खैरे. महिला शिक्षकः प्रा. आसावरी कागवाडे, प्रा. दिपाली गवस. शिक्षकेतर कर्मचारी (महिला): सुरेखा अडके. प्रशासकीय अधिकारीः अजित इंगळे. यावेळी वॉकेथॉनमध्ये प्रेरणादायी सहभाग नोंदविल्याबद्दल माजी सैनिक प्रकाश गुरव आणि श्रीमती आसमा बेडेखान यांचा विशेष गौरव करण्यात आला.

जनसंपर्क कक्ष
30 AUG 2026 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'वॉक फॉर हेल्थ, वॉक फॉर युनिटी'चा संदेश

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त साजऱ्या होणाऱ्या राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधून शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा विभाग आणि स्पोर्ट्स क्लबतर्फे शनिवारी वॉकेथॉनचे आयोजन करण्यात आले. कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांच्या हस्ते फ्लॅग ऑफ करून वॉकेथॉनला प्रारंभ झाला. 'फिट इंडिया, ॲक्टिव्ह इंडिया, हेल्दी इंडिया'चा संदेश देणाऱ्या या उपक्रमात विद्यार्थी, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक अशा दोनशेहून अधिक जणांनी सहभाग घेतला.

विजेत्यांना कुलगुरू डॉ. कामत, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते पदके देऊन गौरविण्यात आले.

निकाल : लहान मुलांच्या गटात भावेश बिष्ट, राजवीर चौगुले व सर्वज्ञ खोत, तर मुलींच्या गटात येसू पाटील, पूर्वा गुरव व संस्कृती खंडागळे यांनी अनुक्रमे क्रमांक मिळविले. मोठ्या मुलांच्या गटात विक्रम भोसले, ज्योतिबा पाटील व श्रीधर खोत, तर मुलींच्या गटात अवंती अवधूत सूर्यवंशी, प्रज्ञा प्रशांत जाधव व स्वरा शैलेश कुलकर्णी विजेते ठरले.

30 AUG 2026

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सहकारी बँकिंग अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा

## सर्वानन एम. : शिवाजी विद्यापीठात कार्यशाळा

कोल्हापूर, ता. २९ : 'सहकारी बँकिंग क्षेत्र भारताच्या तळागाळातील अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा आहे. ठेवीदारांचा विश्वास टिकवून ठेवणे आणि बँकेचे भविष्य सुरक्षित करणे हे मजबूत ट्रेझरी मॅनेजमेंट, पारदर्शक प्रशासनावरच अवलंबून आहे,' असे प्रतिपादन भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पर्यवेक्षण विभागाचे महाव्यवस्थापक सर्वानन एम. यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचे गुरुवर्य लक्ष्मणराव इनामदार सहकार प्रशिक्षण केंद्र, डिस्ट्रीक्ट अर्बन बँक्स को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, कोल्हापूर आणि एसटीसीआय प्रायमरी डिलर्स मुंबईतर्फे व्यवस्थापन विकास कार्यक्रमांतर्गत 'फिक्स्ड इन्कम मार्केट्स इन इंडिया : करंट ट्रेंड्स, थीम्स अँड परस्पेक्टीव्हज् फॉर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स' यावर कार्यशाळा राजर्षी शाहू सभागृहात झाली. कुलगुरू डॉ. आर. के. कामत अध्यक्षस्थानी होते.



कार्यशाळेत बोलताना सर्वानन एम.

सर्वानन म्हणाले, 'गुंतवणूक धोरणाचे तंतोतंत पालन करणे, अंतर्गत लेखापरीक्षण मजबूत ठेवणे आणि आरबीआयच्या सर्व मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करणे हे उच्च प्रशासनाचे मुख्य लक्षण आहे. देशामधील एकूण अर्बन को-ऑपरेअटिव्ह बँकांपैकी जास्त बँका महाराष्ट्रात, त्यातही कोल्हापूर परिक्षेत्रात विस्तारलेल्या आहेत. भारत सरकारच्या वित्तीय धोरणांमधील सकारात्मक बदल आणि रिझर्व्ह बँकेच्या नवीन मार्गदर्शक तत्त्वांमुळे आज भारतीय फिक्स्ड इन्कम



मार्केट एका महत्त्वाच्या वळणावर उभे आहे.'

डॉ. कामत म्हणाले, 'बँकेच्या सर्व नियमांचे तंतोतंत पालन करणे ही केवळ कायदेशीर गरज नसून आपल्या बँकेच्या सुरक्षिततेचे कवच आहे.' आरबीआयचे (मुंबई) सहायक महाव्यवस्थापक नीलेश गावडे, उपाध्यक्ष आणि एसटीसीआयच्या प्रमुख संध्या शशी, एसटीसीआयचे सहायक उपाध्यक्ष गुरूदत्त कुलकर्णी, मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश शिंदे उपस्थित होते. केंद्राचे समन्वयक डॉ. सुभाष कोंबडे यांनी स्वागत केले. एसटीसीआय संशोधन विभागाचे प्रमुख आदित्य व्यास यांनी आभार मानले.

3 0 AUG 2026

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सहकारी बँकिंग तळागाळातील अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा

## भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पर्यवेक्षण विभागाचे महाव्यवस्थापक सर्वानन एम.



जनप्रवास : कोल्हापूर

सहकारी बँकिंग क्षेत्र भारताच्या तळागाळातील अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा आहे. ठेवीदारांचा विश्वास टिकवून ठेवणे आणि बँकेचे भविष्य सुरक्षित करणे हे मजबूत ट्रेझरी मॅनेजमेंट आणि पारदर्शक प्रशासन यांच्यावरच अवलंबून आहे, असे प्रतिपादन भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पर्यवेक्षण विभागाचे महाव्यवस्थापक सर्वानन एम. यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठातील गुरूवर्य लक्ष्मणराव इनामदार सहकार प्रशिक्षण केंद्र, कोल्हापूर डिस्ट्रीक्ट अर्बन बँक्स को-ऑपरेटीव्ह असोसिएशन लिमिटेड, कोल्हापूर आणि एसटीसीआय प्रायमरी डिलर्स लिमिटेड, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने व्यवस्थापन विकास कार्यक्रमांतर्गत 'फिक्स्ड इन्कम मार्केट्स इन इंडिया: करंट ट्रेंड्स, थीम्स अँड परस्पेक्टीव्हज् फॉर अर्बन को-ऑपरेटीव्ह बँक्स' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कुलगुरू डॉ.राजनीश कामत अध्यक्षस्थानी होते.

महाव्यवस्थापक सर्वानन म्हणाले, गुंतवणूक धोरणाचे तंतोतंत पालन करणे, अंतर्गत लेखापरीक्षण मजबूत ठेवणे आणि आरबीआयच्या सर्व मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करणे उच्च प्रशासनाचे मुख्य लक्षण आहे. देशामधील अर्बन को-ऑपरेटीव्ह बँकांपैकी जास्तीत जास्त बँका महाराष्ट्रासह कोल्हापूर परिक्षेत्रात विस्तारलेल्या आहेत. भारत सरकारच्या वित्तीय धोरणांमधील सकारात्मक बदल आणि रिझर्व्ह बँकेच्या नवीन मार्गदर्शक तत्त्वांमुळे भारतीय फिक्स्ड इन्कम मार्केट महत्त्वाच्या वळणावर उभे आहे. गेल्या काही वर्षांत भारतीय रोखे बाजार अधिक पारदर्शक आणि तंत्रज्ञानस्नेही झाला आहे. जागतिक घडामोडींमुळे बाँड यील्डमध्ये गतिमान बदल होत आहेत. आरबीआय महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडत आहे. को-ऑपरेटिव्ह बँकांसाठी केवळ वैधानिक तरलता प्रमाण पूर्ण करणे पुरेसे नाही, तर पोर्टफोलिओचे यिल्ड कसे वाढवता येईल, यावर भर द्या. अध्यक्षस्थानावरून कुलगुरू डॉ. राजनीश कामत म्हणाले, अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकांनी नेहमीच सर्वसामान्यांच्या, लहान व्यापाऱ्यांच्या आणि तळागाळातील घटकांच्या आर्थिक गरजा भागवण्यात मोठी भूमिका बजावली आहे. परंतु, आजचे बँकिंग केवळ ठेवी स्वीकारणे आणि कर्जे वाटणे यापुरते मर्यादित राहिलेले नाही. तंत्रज्ञान आणि बाजारातील साधने दिवसेंदिवस बदलत आहेत. केंद्राचे समन्वयक डॉ. सुभाष कोंबडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. एसटीसीआय संशोधन विभागाचे प्रमुख आदित्य व्यास यांनी आभार मानले. यावेळी आरबीआय (मुंबई) चे सहाय्यक महाव्यवस्थापक निलेश गावडे, उपाध्यक्ष आणि एसटीसीआयच्या प्रमुख संध्या शशी, एसटीसीआयचे सहाय्यक उपाध्यक्ष गुरूदत्त कुलकर्णी, मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश शिंदे यांच्यासह कोल्हापूर जिल्ह्यातील सहकारी बँकांमधील व्यवस्थापकीय संचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

30 AUG 2026

सिंधुदुर्ग समाचार

जनसंपर्क कक्ष
...वाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सहकारी बँकिंग तळागाळातील अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा : सर्वानन एम.




कोल्हापूर/प्रतिनिधी :

सहकारी बँकिंग क्षेत्र भारताच्या तळागाळातील अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा आहे. ठेवीदारांचा विश्वास टिकवून ठेवणे आणि बँकेचे भविष्य सुरक्षित करणे हे मजबूत ट्रेझरी मॅनेजमेंट आणि पारदर्शक प्रशासन यांच्यावरच अवलंबून आहे, असे प्रतिपादन भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पर्यवेक्षण विभागाचे महाव्यवस्थापक सर्वानन एम. यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाचे गुरुवर्य लक्ष्मणराव इनामदार सहकार प्रशिक्षण केंद्र, कोल्हापूर डिस्ट्रीक्ट अर्बन बँक्स को-ऑपरेटीव्ह असोसिएशन लिमिटेड, कोल्हापूर आणि एसटीसीआय प्रायमरी डिलर्स लिमिटेड, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने व्यवस्थापन विकास कार्यक्रमांतर्गत 'फिक्स्ड इन्कम मार्केट्स इन इंडिया: करंट ट्रेंड्स, थीम्स अँड परस्पेक्टीव्हज् फॉर अर्बन को-ऑपरेटीव्ह बँक्स' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये करण्यात आले. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सर्वानन एम. बोलत होते. कुलगुरू डॉ.राजनीश कामत अध्यक्षस्थानी होते.

महाव्यवस्थापक सर्वानन म्हणाले, गुंतवणूक धोरणाचे तंतोतंत पालन करणे, अंतर्गत लेखापरीक्षण मजबूत ठेवणे आणि आरबीआयच्या सर्व मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करणे हे उच्च प्रशासनाचे मुख्य लक्षण आहे. देशामधील एकूण अर्बन को-ऑपरेटीव्ह बँकांपैकी जास्तीत जास्त बँका महाराष्ट्रात आणि त्यातही कोल्हापूर परिक्षेत्रात विस्तारलेल्या आहेत. भारत सरकारच्या वित्तीय धोरणांमधील सकारात्मक बदल आणि रिझर्व्ह बँकेच्या नवीन मार्गदर्शक तत्त्वांमुळे आज भारतीय फिक्स्ड इन्कम मार्केट एका अत्यंत महत्त्वाच्या वळणावर उभे आहे. गेल्या काही वर्षांत भारतीय रोखे बाजार अधिक पारदर्शक आणि तंत्रज्ञानस्नेही झाला आहे. जागतिक घडामोडींमुळे बाँड यील्डमध्ये गतिमान बदल होत आहेत. यामध्ये आरबीआय महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडत आहे. को-ऑपरेटिव्ह बँकांसाठी केवळ वैधानिक तरलता प्रमाण पूर्ण करणे पुरेसे नाही, तर पोर्टफोलिओचे यिल्ड कसे वाढवता येईल, यावर भर देणे गरजेचे आहे. पारंपरिकरित्या अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकांनी केवळ पैशांची बचत करणे पुरेसे नसून ॲक्टिव्ह पोर्टफोलिओ मॅनेजमेंट करणे आवश्यक आहे. ठेवीदारांचा विश्वास आणि बँकेची नफाक्षमता वाढवण्यासाठी ट्रेझरी मॅनेजमेंटमधील 'सुरक्षा, तरलता आणि परतावा' या तिन्ही तत्त्वांचा समतोल राखणे अत्यंत गरजेचे आहे. हा कार्यक्रम फिक्स्ड इन्कम मार्केटमधील जोखीम ओळखण्यासाठी आणि नवीन संधींचा लाभ घेण्यासाठी मार्गदर्शक ठरेल.

अध्यक्षीय मनोगतामध्ये कुलगुरू डॉ.राजनीश कामत म्हणाले, अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकांनी नेहमीच सर्वसामान्यांच्या, लहान व्यापाऱ्यांच्या आणि तळागाळातील घटकांच्या आर्थिक गरजा भागवण्यात मोठी भूमिका बजावली आहे. परंतु, आजचे बँकिंग केवळ ठेवी स्वीकारणे आणि कर्जे वाटणे यापुरते मर्यादित राहिलेले नाही. तंत्रज्ञान आणि बाजारातील साधने दिवसेंदिवस बदलत आहेत. या बदलांशी जुळवून घेणे आवश्यक आहे. बँकेच्या सर्व नियमांचे तंतोतंत पालन करणे ही केवळ कायदेशीर गरज नसून आपल्या बँकेच्या सुरक्षिततेचे कवच आहे.

केंद्राचे समन्वयक डॉ. सुभाष कोंबडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. एसटीसीआय संशोधन विभागाचे प्रमुख आदित्य व्यास यांनी आभार मानले. यावेळी आरबीआय (मुंबई)चे सहाय्यक महाव्यवस्थापक निलेश गावडे, उपाध्यक्ष आणि एसटीसीआयच्या प्रमुख संध्या शशी, एसटीसीआयचे सहाय्यक उपाध्यक्ष गुरुदत्त कुलकर्णी, मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश शिंदे यांच्यासह कोल्हापूर जिल्ह्यातील सहकारी बँकांमधील व्यवस्थापकीय संचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

30 AUG 2026
तरुण भारत

# खांडेकर सुवर्ण स्मृतीवर्ष सांगता २ सप्टेंबरला

त.भा. प्रतिनिधी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा मराठी अधिविभाग आणि आंतरभारती शिक्षण मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने वि. स. खांडेकर सुवर्ण स्मृतीवर्ष सांगता समारंभ स्मृती व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन बुधवार, दि. २ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १०.३० वा. शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात आयोजित केले आहे.



सांगता समारंभाच्या उद्घाटन सत्रामध्ये 'वि. स.खांडेकर: सुवर्ण स्मरण' या विषयावर ज्येष्ठ विचारवंत आणि मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. भालचंद्र मुणगेकर मांडणी करणार आहेत. या समारंभासाठी आंतरभारती शिक्षण संस्थेच्या कार्याध्यक्ष पल्लवी कोरगावकर, प्रा. सुनीलकुमार लवटे, डॉ. अतुल कापडी यांची प्रमुख उपस्थिती असेल. सत्राच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव असणार आहेत.

दुसऱ्या सत्रात 'वि. स. खांडेकरांच्या ग्रंथांवर चर्चा आणि ग्रंथ प्रकाशन' होणार आहे. या सत्राचे अध्यक्ष विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे असतील, तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. मिलिंद जोशी (पुणे) उपस्थित असणार आहेत. या सत्रामध्ये प्रा. सुनिलकुमार लवटे यांनी संपादित केलेल्या ग्रंथांचे तसेच राम देशपांडे व नीलम माणगावे यांच्या ग्रंथांचे प्रकाशन होणार आहे.

तिसऱ्या सत्रात वि. स. खांडेकर सुवर्ण स्मृतीवर्ष विशेषांकाचे प्रकाशन करण्यात येईल. यामध्ये साधना साप्ताहिक (पुणे), दक्षिण महाराष्ट्र साहित्य पत्रिका (कोल्हापूर), जडणघडण (पुणे), मेहता ग्रंथ जगत या अंकांचे प्रकाशन होणार आहे. यामध्ये विनोद शिरसाठ, प्रा. चंद्रकांत पोतदार, सागर देशपांडे, अखिल मेहता, भाग्यश्री पाटील, अमेय मेहता सहभागी होत आहेत, माहिती डॉ. रणधीर शिंदे यांनी दिली.

30 AUG 2026
सकाळ

# विद्यापीठात बुधवारी वि. स. खांडेकर सुवर्ण स्मृती वर्ष सांगता समारंभ

कोल्हापूर, ता. २९ : शिवाजी विद्यापीठाचा मराठी अधिविभाग आणि आंतरभारती शिक्षण मंडळतर्फे वि. स. खांडेकर सुवर्ण स्मृती वर्ष सांगता समारंभ स्मृती व्याख्यान कार्यक्रम बुधवारी (ता. २) सकाळी साडेदहा वाजता विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात होत आहे.

उद्घाटन सत्रात 'वि. स. खांडेकर : सुवर्ण स्मरण' यावर मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. भालचंद्र मुणगेकर मांडणी करतील. 'आंतरभारती'च्या कार्याध्यक्ष पल्लवी कोरगावकर, प्रा. डॉ. सुनीलकुमार लवटे, डॉ. अतुल कापडी उपस्थित राहतील. प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव सत्राच्या अध्यक्षस्थानी असतील.

दुसऱ्या सत्रात वि. स. खांडेकरांच्या ग्रंथांवर चर्चा आणि ग्रंथ प्रकाशन होईल. कुलसचिव डॉ. विलास शिंदे या सत्राचे अध्यक्ष असतील, तर प्रा. मिलिंद जोशी (पुणे) उपस्थित राहतील. या सत्रात प्रा. डॉ. लवटे यांनी संपादित केलेल्या ग्रंथांचे तसेच राम देशपांडे आणि नीलम माणगावे यांच्या ग्रंथांचे प्रकाशन होईल. तिसऱ्या सत्रात वि. स. खांडेकर सुवर्ण स्मृती वर्ष विशेषांकाचे प्रकाशन होईल. यामध्ये साधना साप्ताहिक (पुणे), दक्षिण महाराष्ट्र साहित्य पत्रिका (कोल्हापूर), जडणघडण (पुणे), मेहता ग्रंथ जगत या अंकांचे प्रकाशन होईल. यामध्ये विनोद शिरसाठ, प्रा. चंद्रकांत पोतदार, सागर देशपांडे, अखिल मेहता, भाग्यश्री पाटील, अमेय मेहता सहभागी होत आहेत. ज्येष्ठ पत्रकार डॉ. विजय चोरमारे या सत्राचे अध्यक्ष असतील.

30 AUG 2026

जनप्रवास

# शिवाजी विद्यापीठात २ सप्टेंबरला खांडेकर सुवर्ण स्मृतिवर्ष सांगता समारंभ

**जनप्रवास : कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठाचा मराठी अधिविभाग आणि आंतरभारती शिक्षण मंडळ, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'वि. स. खांडेकर सुवर्ण स्मृतिवर्ष सांगता समारंभ स्मृती व्याख्यान' कार्यक्रमाचे आयोजन बुधवार, दि. २ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १०.३० वा. शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात आयोजित केले आहे.



समारंभाच्या उद्‌घाटन सत्रामध्ये 'वि. स. खांडेकरः सुवर्ण स्मरण' या विषयावर ज्येष्ठ विचारवंत आणि मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. भालचंद्र मुणगेकर मांडणी करणार आहेत. या समारंभासाठी आंतरभारती शिक्षण संस्थेच्या कार्याध्यक्ष पल्लवी कोरगावकर, प्रा. सुनीलकुमार लवटे, डॉ. अतुल कापडी यांची प्रमुख उपस्थिती असेल. सत्राच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव असतील.

दुसऱ्या सत्रामध्ये 'वि. स. खांडेकरांच्या ग्रंथांवर चर्चा आणि ग्रंथ प्रकाशन' होणार आहे. या सत्राचे अध्यक्ष विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे असतील, तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. मिलिंद जोशी (पुणे) उपस्थित असणार आहेत. या सत्रामध्ये प्रा. सुनीलकुमार लवटे यांनी संपादित केलेल्या ग्रंथांचे तसेच राम देशपांडे व नीलम माणगावे यांच्या ग्रंथांचे प्रकाशन होणार आहे.

कार्यक्रमाच्या तिसऱ्या सत्रात वि. स. खांडेकर सुवर्ण स्मृतीवर्ष विशेषांकाचे प्रकाशन करण्यात येईल. यामध्ये साधना साप्ताहिक (पुणे), दक्षिण महाराष्ट्र साहित्य पत्रिका (कोल्हापूर), जडणघडण (पुणे), मेहता ग्रंथ जगत या अंकांचे प्रकाशन होणार आहे. यामध्ये विनोद शिरसाठ, प्रा. चंद्रकांत पोतदार, सागर देशपांडे, अखिल मेहता, भाग्यश्री पाटील, अमेय मेहता सहभागी होत आहेत. या सत्राचे अध्यक्ष ज्येष्ठ पत्रकार व संपादक डॉ. विजय चोरमारे असतील. तरी कार्यक्रमाचा लाभ रसिकांनी घ्यावा, असे आवाहन मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी केले आहे.

30 AUG 2026

सिंधुदुर्ग समाचार

# शिवाजी विद्यापीठात 2 सप्टेंबरला खांडेकर सुवर्ण स्मृतिवर्ष सांगता समारंभ

कोल्हापूर/प्रतिनिधी :

शिवाजी विद्यापीठाचा मराठी अधिविभाग आणि आंतरभारती शिक्षण मंडळ, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'वि. स. खांडेकर सुवर्ण स्मृतिवर्ष सांगता समारंभ स्मृती व्याख्यान' कार्यक्रमाचे आयोजन बुधवार, दि. २ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १०.३० वा. शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात आयोजित केले आहे.

समारंभाच्या उद्घाटन सत्रामध्ये 'वि. स. खांडेकर: सुवर्ण स्मरण' या विषयावर ज्येष्ठ विचारवंत आणि मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. भालचंद्र मुणगेकर मांडणी करणार आहेत. या समारंभासाठी आंतरभारती शिक्षण संस्थेच्या कार्याध्यक्ष पल्लवी कोरगावकर, प्रा. सुनीलकुमार लवटे, डॉ. अतुल कापडी यांची प्रमुख उपस्थिती असेल. सत्राच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव असतील.

दुसऱ्या सत्रामध्ये 'वि. स. खांडेकरांच्या ग्रंथांवर चर्चा आणि ग्रंथ प्रकाशन' होणार आहे. या सत्राचे अध्यक्ष विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे असतील, तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. मिलिंद जोशी (पुणे) उपस्थित असणार आहेत. या सत्रामध्ये प्रा. सुनिलकुमार लवटे यांनी संपादित केलेल्या ग्रंथांचे तसेच राम देशपांडे व नीलम माणगावे यांच्या ग्रंथांचे प्रकाशन होणार आहे.

कार्यक्रमाच्या तिसऱ्या सत्रात वि. स. खांडेकर सुवर्ण स्मृतीवर्ष विशेषांकाचे प्रकाशन करण्यात येईल. यामध्ये साधना साप्ताहिक (पुणे), दक्षिण महाराष्ट्र साहित्य पत्रिका (कोल्हापूर), जडणघडण (पुणे), मेहता ग्रंथ जगत या अंकाचे प्रकाशन होणार आहे. यामध्ये विनोद शिरसाठ, प्रा. चंद्रकांत पोतदार, सागर देशपांडे, अखिल मेहता, भाग्यश्री पाटील, अनेय मेहता सहभागी होत आहेत. या सत्राचे अध्यक्ष ज्येष्ठ पत्रकार व संपादक डॉ. विजय चोरमारे असतील. तरी कार्यक्रमाचा लाभ रसिकांनी घ्यावा, असे आवाहन मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी केले आहे.

30 AUG 2026 सिंधुदुर्ग समाचार

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आदिवासींनी केलेल्या बांबूच्या राख्यांना शिवाजी विद्यापीठात प्रतिसाद



कोल्हापूर/प्रतिनिधी :
पालघर जिल्ह्यातील आदिवासी महिलांनी बांबूपासून तयार केलेल्या पर्यावरणपूरक राख्यांचा प्रसार, प्रसिद्धी आणि विक्रीच्या कामी शिवाजी विद्यापीठाच्या स्वयंसिद्धाच्या माध्यमातून आणि यु. जी. सी. स्कीम फॉर पर्सन्स विथ डिसेबिलिटी केंद्राकडून मोठा हातभार लाभला. राबविलेल्या या उपक्रमांतर्गत सुमारे ४५०० रुपयांच्या राख्यांची विक्रीही करण्यात केंद्राला यश आले. तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी रक्षाबंधन उपक्रमही घेण्यात आला.

पालघर जिल्ह्यातील आदिवासी महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी 'सेवा विवेक' ही संस्था अग्रेसर आहे. तेथील आदिवासी महिलांनी बांबूपासून वेगवेगळ्या वस्तू तयार केलेल्या आहेत. बांबूपासून तयार केलेल्या राख्या खूप सुंदर व सुबक आहेत. पारंपारिक राखीला पर्यावरणपूरक आणि आकर्षक पर्याय म्हणून बांबूच्या राख्यांकडे पाहिले जाते. महिलांना स्वयंरोजगारातून सक्षमीकरण करण्यासाठी, त्या महिलांनी तयार केलेल्या राखी विकत घेऊन त्यांच्या या कार्याला हातभार विद्यापीठामध्ये 'स्वयंसिद्धा' केंद्राच्या सहकार्यातून लावण्यात आला आहे. या राख्या विद्यापीठातील अधिविभाग व महाविद्यालयांतील विद्यार्थिनी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विकत घेतल्या. समाजशास्त्र अधिविभाग, शिक्षणशास्त्र अधिविभाग आणि विद्यार्थिनी वसतिगृहातील विद्यार्थिनींनी या राख्या मोठ्या प्रमाणात खरेदी केल्या. जयवंत महाविद्यालय इचलकरंजी यांनीदेखील मोठ्या संख्येने राख्या खरेदी केल्या.

स्वयंसिद्धा केंद्राच्या आणि यु. जी. सी. स्कीम फॉर पर्सन्स विथ डिसेबिलिटीच्या माध्यमातून दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी रक्षाबंधनाचा कार्यक्रमही घेण्यात आला. विद्यापीठातील स्वयंसिद्धाच्या समन्वयक डॉ. प्रतिभा बा. देसाई, दीप्ती कांबळे यांनी या उपक्रमास विशेष योगदान दिले.

जनसंपर्क कक्ष

30 AUG 2026 जनप्रवास शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आदिवासींनी केलेल्या बांबूच्या राख्यांना शिवाजी विद्यापीठात प्रतिसाद

जनप्रवास : कोल्हापूर

पालघर जिल्ह्यातील आदिवासी महिलांनी बांबूपासून तयार केलेल्या पर्यावरणपूरक राख्यांचा प्रसार, प्रसिद्धी आणि विक्रीच्या कामी शिवाजी विद्यापीठाच्या स्वयंसिद्धाच्या माध्यमातून आणि यु. जी. सी. स्कीम फॉर पर्सन्स विथ डिसेबिलिटी केंद्राकडून मोठा हातभार लाभला. राबविलेल्या या उपक्रमांतर्गत सुमारे ४५०० रुपयांच्या राख्यांची विक्रीही करण्यात केंद्राला यश आले. तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी रक्षाबंधन उपक्रमही घेण्यात आला.

पालघर जिल्ह्यातील आदिवासी महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी 'सेवा विवेक' ही संस्था अग्रेसर आहे. तेथील आदिवासी महिलांनी बांबूपासून वेगवेगळ्या वस्तू तयार केलेल्या आहेत. बांबूपासून तयार केलेल्या राख्या खूप सुंदर व सुबक आहेत. पारंपरिक राखीला



पर्यावरणपूरक आणि आकर्षक पर्याय म्हणून बांबूच्या राख्यांकडे पाहिले जाते. महिलांना स्वयंरोजगारातून सक्षमीकरण करण्यासाठी, त्या महिलांनी तयार केलेल्या राखी विकत घेऊन त्यांच्या या कार्याला हातभार विद्यापीठामध्ये 'स्वयंसिद्धा' केंद्राच्या सहकार्यातून लावण्यात आला आहे. या राख्या विद्यापीठातील अधिविभाग व महाविद्यालयांतील विद्यार्थिनी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विकत घेतल्या. समाजशास्त्र अधिविभाग, शिक्षणशास्त्र अधिविभाग आणि विद्यार्थिनी वसतिगृहातील विद्यार्थिनींनी या राख्या मोठ्या प्रमाणात खरेदी केल्या. जयवंत महाविद्यालय इचलकरंजी यांनीदेखील मोठ्या संख्येने राख्या खरेदी केल्या.

स्वयंसिद्धा केंद्राच्या आणि यु. जी. सी. स्कीम फॉर पर्सन्स विथ डिसेबिलिटीच्या माध्यमातून दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी रक्षाबंधनाचा कार्यक्रमही घेण्यात आला. विद्यापीठातील स्वयंसिद्धाच्या समन्वयक डॉ. प्रतिभा बा. देसाई, दीप्ती कांबळे यांनी या उपक्रमास विशेष योगदान दिले.

30 AUG 2026
सकाळ

# आदिवासींनी केलेल्या बांबूच्या राख्यांना विद्यापीठात प्रतिसाद

कोल्हापूर : पालघर जिल्ह्यातील आदिवासी महिलांनी बांबूपासून तयार केलेल्या पर्यावरणपूरक राख्यांचा प्रसार, प्रसिद्धी आणि विक्रीच्या कामी शिवाजी विद्यापीठाच्या स्वयंसिद्धाच्या माध्यमातून आणि यु.जी.सी. स्कीम फॉर पर्सन्स विथ डिसेबिलिटी केंद्राकडून हातभार लाभला. राबविलेल्या उपक्रमांतर्गत सुमारे ४५०० रुपयांच्या राख्यांची विक्री करण्यात केंद्राला यश आले. तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी रक्षाबंधन उपक्रमही घेतला. पालघर जिल्ह्यातील आदिवासी महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी 'सेवा विवेक' ही संस्था अग्रेसर आहे. तेथील आदिवासी महिलांनी बांबूपासून वेगवेगळ्या वस्तू तयार केलेल्या आहेत. बांबूपासून तयार केलेल्या राख्या सुबक आहेत. महिलांना स्वयंरोजगारातून सक्षमीकरण करण्यासाठी, त्या महिलांनी तयार केलेल्या राखी विकत घेऊन त्यांच्या या कार्याला हातभार 'स्वयंसिद्धा'च्या सहकार्यातून लागला.

3 0 AUG 2026

जनप्रवास

# 'चंद्रपूरच्या जंगलात' अभिवाचनाला शिवाजी विद्यापीठात मोठा प्रतिसाद

**जनप्रवास : कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठाचा बी. ए. फिल्म मेकिंग विभाग आणि 'एन अनुप जत्राटकर मल्टीमीडिया प्रॉडक्शन्स' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'चंद्रपूरच्या जंगलात...' या नाटकाच्या अभिवाचनाला शिवाजी विद्यापीठात मोठा प्रतिसाद मिळाला.

नाट्य क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केलेल्या 'अवकाश' चे हे सादरीकरण उपस्थितांची वाहवा मिळवून गेले. ज्येष्ठ लेखक विक्रम वाटवे यांची कलाकृती रंगमंचावर जिवंत करण्याचे काम सुप्रसिद्ध अभिवाचक समीर दळवी आणि दिग्दर्शक ह्रदयनाथ जाधव यांनी केले. तासभर सुरू असलेल्या या प्रयोगाने सर्वांना खिळवून ठेवले होते. कार्यक्रमानंतर दिग्दर्शक ह्रदयनाथ जाधव



आणि समीर दळवी यांच्याशी शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी संवाद साधला.

स्वागत अनुप जत्राटकर यांनी केले. प्रास्ताविक फिल्म मेकिंगचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले. सूत्रसंचालन साक्षी वाघमोडे हिने केले. आभार प्रवीण पांढरे यांनी मानले. यावेळी इंग्रजी विभागाच्या डॉ. तृप्ती करेकट्टी, सामाजिक वंचितता विभागाचे अविनाश भाले, शरद आजगेकर, डॉ. प्रमोद कसबे, विकास कांबळे, डॉ. सुमेधा साळुंखे, जयप्रकाश पाटील यांच्यासह नाट्यशास्त्र विभागाचे विद्यार्थी उपस्थित होते.

3 0 AUG 2026

सिंधुदुर्ग समाचार

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# चंद्रपूरच्या जंगलात' अभिवाचनाला शिवाजी विद्यापीठात मोठा प्रतिसाद



**कोल्हापूर/प्रतिनिधी :** शिवाजी विद्यापीठाचा बी. ए. फिल्म मेकिंग विभाग आणि 'एन अनुप जत्राटकर मल्टीमीडिया प्रॉडक्शन्स' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'चंद्रपूरच्या जंगलात...' या नाटकाच्या अभिवाचनाला शिवाजी विद्यापीठात मोठा प्रतिसाद मिळाला.

नाट्य क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केलेल्या 'अवकाश' चे हे सादरीकरण उपस्थितांची वाहवा मिळवून गेले. ज्येष्ठ लेखक विक्रम वाटवे यांची कलाकृती रंगमंचावर जिवंत करण्याचे काम सुप्रसिद्ध अभिवाचक समीर दळवी आणि दिग्दर्शक हृदयनाथ जाधव यांनी केले. तासभर सुरू असलेल्या या प्रयोगाने सर्वांना खिळवून ठेवले होते. कार्यक्रमानंतर दिग्दर्शक हृदयनाथ जाधव आणि समीर दळवी यांच्याशी शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी संवाद साधला.

स्वागत अनुप जत्राटकर यांनी केले. प्रास्ताविक फिल्म मेकिंगचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले. सूत्रसंचालन साक्षी वाघमोडे हिने केले. आभार प्रवीण पांढरे यांनी मानले. यावेळी इंग्रजी विभागाच्या डॉ. तृप्ती करेकट्टी, सामाजिक वंचितता विभागाचे अविनाश भाले, शरद आजगेकर, डॉ. प्रमोद कसबे, विकास कांबळे, जयप्रकाश पाटील यांच्यासह नाट्यशास्त्र विभागाचे विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
वाजी विद्यापीठ, कोल्हापूर

30 AUG 2026

सिंधुदुर्ग समाचार

# संविधानातील बंधुता मूल्य सर्वोच्च महत्त्वाचे : भन्ते डॉ. यश काश्यपायन


कोल्हापूर/प्रतिनिधी :

भारतीय संविधान मानवतावादाची शिकवण देणारे असून, त्यातील बंधुता मूल्य सर्वोच्च महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन भन्ते डॉ. यश काश्यपायन यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्या आजी-माजी विद्यार्थ्यांच्या स्नेहमेळाव्यात प्रमुख अतिथी म्हणून ते काल (दि. २६) बोलत होते. कुलसचिव डॉ. विलास शिंदे अध्यक्षस्थानी होते.

केंद्राच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार, भारतीय संविधान, पाली भाषा आणि संवैधानिक आरक्षण धोरण या विविध पदव्युत्तर पदविका व प्रमाणपत्र अभ्यासक्रमांच्या आजी-माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळाव्यास सुमारे दीडशेहून अधिक जणांची उपस्थिती लाभली. त्यांना संबोधित करताना भन्ते डॉ. काश्यपायन म्हणाले, माणसाने दुसऱ्या माणसाचा शत्रू होऊ नये, परस्परांमध्ये ऐक्य आणि मानवतेची भावना निर्माण व्हावी, यासाठी संविधानाची गरज आहे. मानवाचे संरक्षण आणि त्याच्या प्रतिष्ठेचे जतन करण्यासाठी भारतीय संविधानाची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. त्या दृष्टीने संविधान आणि बुद्धाच्या धम्मातील मानवतावादी विचारांमध्ये खूप साम्य आहे. बुद्धाची शिकवण माणसाला अहंकार, क्रोध आणि द्वेषापासून दूर नेत असून, मैत्री, करुणा आणि सर्व जीवांप्रती असीम दया बाळगण्याचा मार्ग दाखवते. बुद्धाच्या धम्माचा केंद्रबिंदू मानव आणि मानवतेशी संबंधित असून, मनुष्य हा जगाचे रक्षणही करू शकतो आणि विनाशही करू शकतो, त्यामुळे मानवतेचे संरक्षण करणे ही सर्वांची जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले.

पाली भाषा संवर्धनाची चळवळ ही केवळ भाषेपुरती मर्यादित न राहता विचारांची चळवळ बनली पाहिजे, अशी अपेक्षा कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी व्यक्त केली. ते म्हणाले, गौतम बुद्ध, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवांचे विचार आणि कार्य वेगवेगळे न पाहता त्यातील सकारात्मक विचारांची सांगड घालण्याची गरज आहे. समाजातील विविध घटकांना समान महत्त्व देण्याची भूमिका छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यव्यवस्थेत आणि भारतीय संविधानातही दिसून येते. भारतीयत्व हा आपला धर्म आणि संविधान हा आपला धर्मग्रंथ बनला, तरच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्वप्नातील भारत साकार होईल, असे प्रतिपादन केले.

धम्माचे गाढे अभ्यासक अमित मेधावी यांनी पाली भाषा ही केवळ एक प्राचीन भाषा नसून भारतीय मानवतावादी परंपरेचे मूळ तत्त्वज्ञान समजून घेण्याची गुरुकिल्ली असल्याचे सांगितले. ते म्हणाले, पाली, मागधी आणि संस्कृतसारख्या प्राचीन भाषांचा अभ्यास केल्याशिवाय प्राचीन भारताचे ज्ञान आणि धम्मातील मूळ अर्थ समजणे अशक्य आहे. धम्मपदातील शिकवण पाहता मैत्री आणि करुणा हाच खरा सनातन धर्म आहे, असे स्पष्ट केले. अधिकाधिक युवकांनी या अभ्यासक्रमांमध्ये सहभागी होऊन धम्माचा चिकित्सक अभ्यास करावा, असे आवाहन त्यांनी केले.



यावेळी विविध अभ्यासक्रमांमध्ये प्रावीण्यप्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. शशिकांत कांबळे, सुरेखा नरदे, विजय कुशाण, नेहा विटेकरी, सुप्रभा चोपडे, सिद्धार्थ दीक्षित, समर्थ भारतीय, डॉ. बालाजी लातुरे यांनी मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. कुलवीर कांबळे, डॉ. दीपा श्रावस्ती, डॉ. अमोल मिणचेकर उपस्थित होते. तसेच, डॉ. कपिल राजहंस, ॲड. करुणा मिणचेकर, अनिल वेटम, डॉ. चंद्रकांत कुरणे, डॉ. तेजपाल मोहरेकर उपस्थित होते. केंद्राचे संचालक डॉ. पवन गायकवाड यांनी स्वागत व प्रास्ताविक केले, तर सागर कांबळे यांनी सूत्रसंचालन केले.

जनसंपर्क कक्ष

3 0 AUG 2026

पुढारी

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संविधानातील बंधुता मूल्य सर्वोच्च महत्त्वाचे

## भन्ते डॉ. यश काश्यपायन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

भारतीय संविधान मानवतावादाची शिकवण देणारे असून, त्यातील बंधुता मूल्य सर्वोच्च महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन भन्ते डॉ. यश काश्यपायन यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्या आजी-माजी विद्यार्थ्यांच्या स्नेहमेळाव्यात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे अध्यक्षस्थानी होते. भन्ते डॉ. काश्यपायन म्हणाले, माणसाने दुसऱ्या माणसाचा शत्रू होऊ नये, परस्परांमध्ये ऐक्य व मानवतेची



**कोल्हापूर : स्नेहमेळाव्यात बोलताना भन्ते डॉ. यश काश्यपायन.**

भावना निर्माण व्हावी, यासाठी संविधानाची गरज आहे. संविधान व बुद्धाच्या धम्मातील मानवतावादी विचारांमध्ये साम्य असून, मैत्री, करुणा आणि दया ही मूल्ये समाजाने आत्मसात करावीत, असे त्यांनी सांगितले.

कुलसचिव डॉ. शिंदे यांनी पाली भाषा संवर्धनाची चळवळ केवळ भाषेपुरती मर्यादित न राहता विचारांची चळवळ बनली पाहिजे, असे सांगितले. अमित मेधावी यांनी पाली भाषा ही भारतीय मानवतावादी परंपरा समजून घेण्याची गुरुकिल्ली असल्याचे सांगितले. विविध अभ्यासक्रमांतील प्रावीण्यप्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

केंद्राचे संचालक डॉ. पवन गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. सागर कांबळे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. कुलवीर कांबळे, डॉ. दीपा श्रावस्ती, डॉ. अमोल मिणचेकर, डॉ. कपिल राजहंस, निल वेटम, डॉ. चंद्रकांत कुरणे आदी उपस्थित होते.

30 AUG 2026
पुढारी

# रिल्स मेकिंग स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र प्रदान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात मतदान जनजागृतीसाठी आयोजित रिल्स मेकिंग स्पर्धेत बक्षीस मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. प्र-कुलगुरू प्रा. डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले.

मास कम्युनिकेशन विभाग, बेटी बचाओ अभियान आणि विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने स्पर्धेचे आयोजन केले होते. प्रफुल्ल कराडे (प्रथम), शहाजी निंबाळकर (द्वितीय), समृद्धी मोदक (तृतीय), तर प्रज्ञा मांदिगरे (उत्तेजनार्थ) आदींचा गौरव करण्यात आला. मास कम्युनिकेशनचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव, बेटी बचाव अभियानाच्या समन्वयक प्रा. डॉ. प्रतिमा देसाई, विद्यार्थी विकास विभागाचे तत्कालीन संचालक डॉ. तानाजी चौगुले यांनी परीक्षण केले.

30 AUG 2026
पुढारी

# महिलांना संधी, हक्क व सुरक्षिततेची माहिती आवश्यक : डॉ. जाधव

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

महिलांनी स्वतःच्या क्षमतांवर विश्वास ठेवून शिक्षण, विज्ञान-तंत्रज्ञान, रोजगार तसेच समाजातील विविध क्षेत्रांत पुढे यावे. त्यासाठी उपलब्ध संधी, सुविधा, हक्क व सुरक्षिततेची माहिती असणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचे विद्यार्थिनी वसतिगृह आणि स्वयंसिद्धा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'शी टॉक' उपक्रमात त्या बोलत होत्या.

डॉ. प्रतिमा देसाई यांनी 'स्वयंसिद्धा' ॲपची माहिती देत महिलांच्या उपक्रम व यशाची माहिती या माध्यमातून इतरांपर्यंत पोहोचविता येत असल्याचे सांगितले.

विद्यार्थिनी वसतिगृहाच्या मुख्य अधीक्षक डॉ. माधुरी वाळवेकर यांनी पॉश कायदा, महिलांचे कायदेशीर अधिकार, सुरक्षित कार्यस्थळ आणि तक्रार निवारण प्रक्रियेची माहिती दिली. साक्षी धनावडे यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी डॉ. निलांबरी जगताप, डॉ. कविता वड्राळे, डॉ. मीना पोतदार, कर्मचारी व विद्यार्थिनी उपस्थित होत्या. डॉ. ज्योती खराडे यांनी आभार मानले.

30 AUG 2026

पुढारी

# छंद सुखद क्षणांचे सोबती : देवळालकर

**कोल्हापूर :** छंद हे सुखद क्षणांचे सोबती असून आयुष्यातील उणीव भरून काढण्याचे काम करतात, असे प्रतिपादन डॉ. धनंजय देवळालकर यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागात 'छंद' या विषयांतर्गत आयोजित 'दुर्मीळ आवाजांचे जतन' या विशेष व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. नंदकुमार मोरे होते. डॉ. देवळालकर यांनी दुर्मीळ गाणी, महत्त्वाच्या नेत्यांचे आवाज जतन करण्याबरोबरच पेन व विविध प्रकारच्या घड्याळांचा संग्रह करण्याचा आपला छंद सांगितला. यावेळी त्यांनी १९२० पासूनची काही महत्त्वाची गाणी तसेच महात्मा गांधी यांचे भाषण ऐकविले. डॉ. मोरे यांनी छंदांमुळे विद्यार्थ्यांची सर्वांगीण दृष्टी विकसित होते, असे सांगितले. यावेळी ना. धों. महानोर पुरस्कारप्राप्त युवा कादंबरीकार विठ्ठल खिलारी यांचा विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास संशोधक विद्यार्थी व एम.ए.चे विद्यार्थी उपस्थित होते. डॉ. सुखदेव एकल यांनी सूत्रसंचालन केले. प्रांजली क्षीरसागर यांनी आभार मानले.

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 AUG 2026
पुढारी

# सांगलीत आज पत्रकारांसाठी राज्यस्तरीय कार्यशाळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन व अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. ३०) सांगली येथे पत्रकारांसाठी एकदिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यशाळेसाठी राज्यभरातून सुमारे ३०० पत्रकारांनी नोंदणी केली आहे.

सांगली पोलीस मुख्यालयातील कृष्णा मॅरेज हॉल येथे सकाळी दहा वाजता कार्यशाळेचे उद्घाटन होणार आहे. पहिल्या सत्रात पत्रकारिता अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव हे 'डिजिटल माध्यमांसाठीच्या कायदेशीर तरतुदी' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. दुसऱ्या सत्रात ज्येष्ठ पत्रकार विवेक वाघमोडे हे 'फेक न्यूज कशी ओळखावी?' या विषयावर सादरीकरण करतील. सहभागी पत्रकारांना शिवाजी विद्यापीठाच्या वतीने प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

पत्रकारांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष शिवराज काटकर यांनी केले आहे.

30 AUG 2026 **लोकमत** जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**'लोकमत'च्या वर्धापनदिनास हार्दिक शुभेच्छा !**

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र



## ज्ञानाच्या कक्षेतून यशाच्या दिशेने.... आता, ऑनलाईन !

**शिका... कुठेही... कधीही !**

**ऑनलाईन**
व डिस्टन्स मोड
अभ्यासक्रम

**उज्ज्वल भविष्यासाठी खात्री !**

### ऑनलाईन व डिस्टन्स मोड अभ्यासक्रम

- बी. ए. (डिस्टन्स मोड)
- बी. कॉम. (डिस्टन्स मोड)
- एम. ए. (डिस्टन्स मोड) (मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास, अर्थशास्त्र)
- एम. बी. ए. (ऑनलाईन व डिस्टन्स मोड)
- एम. कॉम. (ऑनलाईन व डिस्टन्स मोड)
- एम. एस्सी. (गणित) (ऑनलाईन व डिस्टन्स मोड)
- प्रमाणपत्र अभ्यासक्रम



आजच प्रवेश घ्या आणि उज्ज्वल भविष्यासाठी सुरुवात करा !

अधिक माहितीचा तपशील विद्यापीठ संकेतस्थळाच्या खालील लिंकवर https://online.unishivaji.ac.in/admissions/ उपलब्ध किंवा खालील क्रमांकावर अथवा ई-मेलवर संपर्क साधावा.

**अंतिम प्रवेशाची मुदत १०-०९-२०२६**

अभ्यासक्रम, प्रवेश व इतर माहितीसाठी संपर्क साधा.
फोन : 0231-2609451, 2609452, 2609409

Mail : cde@unishivaji.ac.in
जावक क्रमांक : शिवाजी वि./सीडीओई/५८१, दि. २९-०८-२०२६

डॉ. व्ही. एन. शिंदे
कुलसचिव